**प्रेसनोट दि. ०६.१२.२०२२**

लोकसेवीका श्रीमती पुजा किशोर साळुंखे वय ५२ वर्ष व्यवसाय- ऑपरेटर नागरी सुविधा केंद्र तहसिल कार्यालय विटा व श्री.प्रतिक किशोर साळुंखे वय २८ वर्ष व्यवसाय-शिक्षण दोन्ही रा. सावरकरनगर विटा ता.खानापूर जि.सांगली यांना १७००/-रूपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे भावाच्या नावचा नॉन क्रिमिलेयर दाखल्याचे प्रकरण प्रांत कार्यालयास पाठवण्यासाठी नागरी सुवीधा केंद्र तहसिल कार्यालय विटा येथील श्रीमती साळुंखे यांनी तक्रारदार यांचेकडे २०००/-रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज दि.०५.१२.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०५.१२.२०२२ रोजी व दि.०६.१२.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणी मध्ये लोकसेवीका श्रीमती साळुंखे यांनी तक्रारदार यांचेकडे २०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती १७००/- रूपये घेवून येण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.०६.१२.२०२२ रोजी नागरी सुविधा केंद्र तहसिल कार्यालय विटा या ठिकाणी सापळा लावला असता सापळा कारवाई वेळी लोकसेवीका श्रीमती साळुंखे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १७००/- रूपये लाच रक्कम श्री. प्रतिक किशोर साळुंखे यांचेकडे देण्यास सांगीतली. त्याप्रमाणे श्री. प्रतिक किशोर साळुंखे यांनी १७००/- लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारल्यानंतर दोघांनाही पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवीका श्रीमती पुजा किशोर साळुंखे वय ५२ वर्ष व्यवसाय- ऑपरेटर नागरी सुविधा केंद्र तहसिलदार कार्यालय विटा व श्री.प्रतिक किशोर साळुंखे वय २८ वर्ष व्यवसाय-शिक्षण दोन्ही रा. सावरकरनगर विटा ता.खानापूर जि.सांगली यांचे विरुध्द विटा पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे पोलीस उप आयुक्त / पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त / अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री.विनायक भिलारे पोलीस निरीक्षक, श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, संजय संकपाळ, सिमा माने, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, चालक अनिस वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, वदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट — www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक * लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner